


# पारनेर दर्शन




वर्ष ४ अंक ११, रविवार २२ फेब्रुवारी २०२६ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# नीलेश लंके प्रतिष्ठानच्या ‘आदर्श पुरस्कारां’ची घोषणा

## राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात रविवारी सन्मान सोहळा | खा. नीलेश लंके यांच्या हस्ते गौरव

**पारनेर : प्रतिनिधी**

**ग्रामीण भागातील कर्तृत्वाला व्यासपीठ मिळावे आणि समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने नीलेश लंके प्रतिष्ठान व आपला मावळा सामाजिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रांतील मान्यवरांना ‘आदर्श पुरस्कार’ देऊन गौरविण्यात येणार आहे. शनिवारी पुरस्कारांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, रविवारी सकाळी ९ वाजता पारनेर येथे आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात विशेष सन्मान सोहळा पार पडणार आहे.**

या कार्यक्रमाला खासदार नीलेश लंके यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, त्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे. कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील शेतकरी, उद्योजक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामपंचायत पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याने हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडण्याची अपेक्षा आहे.



### निवड प्रक्रियेत पारदर्शकता

पुरस्कारार्थींची निवड करताना विविध क्षेत्रांसाठी स्वतंत्र तज्ज्ञ समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. सामाजिक, शैक्षणिक, कृषी, उद्योग व ग्रामविकास क्षेत्रातील जाणकार सदस्यांनी प्राप्त झालेल्या नामनिर्देशनांची बारकाईने छाननी केली. कामगिरीची सातत्यता, समाजावरील प्रभाव, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि स्थानिक पातळीवरील नेतृत्व या निकषांवर अंतिम नावे निश्चित करण्यात आली.

### सामाजिक कार्य

समाजहिताच्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या पुढील मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. डॉ. गिरीष कुलकर्णी (अहिल्यानगर), अभिषेक राजेंद्र दंडनाईक (श्रीगोंदा), तुकाराम बबन वाखारे (पानोली, ता. पारनेर), हरिहर गर्जे (पाथर्डी), बाळासाहेब नारायण चौधरी (अमरापूर, ता. शेवगाव). या सर्वांनी सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवून ग्रामीण भागात जनजागृती व विकासकामांना चालना दिली आहे.

### आदर्श शेतकरी पुरस्कार

नाविन्यपूर्ण शेतीपद्धती, पीकपद्धतीतील बदल, पशुपालन आणि पूरक व्यवसायांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना हा सन्मान दिला जाणार आहे. काशिनाथ रामभाऊ खरमाळे (भांडगाव, ता. पारनेर), ज्ञानदेव सखाराम हिरवे (पारगाव, ता. श्रीगोंदा), शशिकांत बोरुडे (खर्डे, पाथर्डी), किशोर रघुनाथ कोहकडे (बारगाव नांदूर, ता. राहुरी), अमोल रामदास जगताप (भांबोरा, ता. कर्जत), संदेश श्रीराम हजारे (जवळा, ता. जामखेड), नाथ मुरलीधर देशमुख (अकोळनेर, ता. नगर), कल्याणी कैलास मुरदारे (भगूर, ता. शेवगाव), सूर्यकांत विलास नेटके (सावेडी, नगर).

### आदर्श शिक्षक

शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचे प्रयत्न आणि नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती यासाठी पुढील शिक्षकांचा गौरव करण्यात येणार आहे. विठ्ठल विलास शिंदे (उपाध्यापक, श्रीगोंदा), मनिषा श्रीरंग रायकर (उपाध्यापिका, कर्जत), अनिता विठ्ठल पवार (उपाध्यापिका, जामखेड), आरिफ युसुफ बेग (पदवीधर शिक्षक, पाथर्डी), कल्याण महादेव पोटभरे (उपाध्यापक, शेवगाव), अनिता भागुजी खरमाळे (राहुरी), बंडू शिवाजी जपकर (नगर), ज्योती दत्तात्रय साबळे (उपाध्यापिका, पारनेर), शंकर भिमराज बारस्कर (क्रीडा शिक्षक, नगर).

### आदर्श सरपंच

ग्रामविकासातील प्रभावी नेतृत्वासाठी पुढील सरपंचांचा गौरव होणार आहे. संदीप विठ्ठल गाडेकर (पानोली, ता. पारनेर), श्रीकांत राजाराम डेरे (रेनवडी, ता. पारनेर), सुरेखा दत्तात्रय धुमाळ (मुंगुसगाव, ता. श्रीगोंदा), ज्योती ज्ञानदेव लष्कर (बहिरोबावाडी, ता. कर्जत), अश्विनी सागर कोल्हे (राजुरी, ता. जामखेड), ज्ञानेश्वरी राजेंद्र शिरसाठ (पिंपळगाव टप्पा, ता. पाथर्डी), आयोध्या शंकर काटे (आखेगाव, ता. शेवगाव), दीपक भाऊ मकासरे (कुक्कुढवेढा, ता. राहुरी), शरद खंडेराव पवार (चिचोंडी पाटील, ता. नगर), राजू आंबेकर (भोयरे खुर्द, ता. नगर).

### आदर्श उद्योजक

ग्रामीण भागात उद्योग उभे करून रोजगारनिर्मिती करणाऱ्या उद्योजकांचा गौरव होणार आहे. सचिन हरिभाऊ पाचपुते (काष्टी, ता. श्रीगोंदा), अख्तर अजित आत्तार (कुळधरण, ता. कर्जत), शोएब हफिजउद्दीन शेख (शेवगाव), राम सुधाकर पाथरकर (पाथर्डी), सावरमल रामेश्वर गुजर (सुपा, ता. पारनेर), दौलत शिंदे (नगर शहर).

### उत्कृष्ट गोपालक / गोशाळा

दुग्धव्यवसाय व गोसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल धनंजय खंडू पानमंद (म्हस्केवाडी, ता. पारनेर) यांचा विशेष सन्मान केला जाणार आहे.

### प्रेरणादायी उपक्रम

ग्रामीण भागातील सकारात्मक कार्याला चालना देणे, तरुण पिढीला प्रेरणा देणे आणि विविध क्षेत्रांत नाविन्यपूर्ण काम करणाऱ्यांचा सन्मान करणे हा या पुरस्कारांचा मुख्य उद्देश आहे. कृषी प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर होणारा हा सन्मान सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता ग्रामीण विकासाच्या नव्या वाटा दाखवणारा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. पारनेर तालुक्यातील हा सन्मान सोहळा सामाजिक, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रातील कार्यकर्त्यांसाठी अभिमानाचा क्षण ठरणार आहे.

### आदर्श बचत गट

राधिका महिला स्वयंसहायता समूह (देवीभोयरे, ता. पारनेर) यांचा ‘आदर्श बचत गट’ म्हणून सन्मान होणार आहे. या गटाने मसाले, शेवई, पापड निर्मिती, कुक्कुटपालन, गोपालन, प्रिंटिंग तसेच नारळ विक्री यांसारख्या उपक्रमांतून आर्थिक स्वावलंबन साधले आहे.

# खमंग थालीपीठ ते झणझणीत पाणीपुरी !

## | कृषी प्रदर्शनातील ‘खाऊ गल्ली’ ठरली सुपरहिट! शेती औजारे, सुधारित वाणांना मोठी मागणी | ग्राहकपयोगी वस्तू खरेदीत महिलांचा उत्साह उसळला



**पारनेर : प्रतिनिधी**

पारनेर येथे खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाने अक्षरशः जत्रेचे स्वरूप धारण केले आहे. शेतीपूरक तंत्रज्ञान, पशुधन, ग्राहकपयोगी वस्तू आणि खाद्यसंस्कृती यांचा संगम अनुभवण्यासाठी तालुक्यासह जिल्हाभरातून नागरिक मोठ्या संख्येने भेट देत आहेत. प्रदर्शनातील विविध स्टॉल्सना भेट दिल्यानंतर नागरिकांची पावले ‘खाऊ गल्ली’कडे वळत असून येथे दिवसभर चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे.

### खाऊ गल्लीत चवींचा महापूर

प्रदर्शनाच्या शेवटच्या टप्प्यात उभारण्यात आलेली ‘खाऊ गल्ली’ हीच जणू या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरत आहे. खमंग थालीपीठावर लोण्याचा तुकडा, झणझणीत मसाल्याची मासवडी, चटपटीत भेळ, तिखट-गोड पाणीपुरी, गरमागरम वडापाव आणि विविध प्रकारचे डोसे यांचा सुवास संपूर्ण परिसरात दरवळत आहे. थंड पेये, लिंबूपाणी यांचाही आस्वाद घेत नागरिकांनी खाद्यपदार्थांची मेजवानी लुटली.कुटुंबासह आलेल्या नागरिकांनी आधी प्रदर्शनातील कृषी स्टॉल्सना भेट देत माहिती घेतली आणि त्यानंतर खाऊ गल्लीत विसावून गप्पा, फोटोसेशन आणि खाद्याचा आनंद घेतला. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटातील नागरिक येथे उत्साहाने सहभागी होत असल्याचे चित्र शनिवारी दिवसभर पाहायला मिळाले.

### पशुधन विभागात विशेष आकर्षण

प्रदर्शनात सादर करण्यात आलेली बुटकी म्हैस आणि तब्बल १५० किलो वजनाचा बोकड हे विशेष आकर्षण ठरले. या पशुधनाभोवती नागरिकांची गर्दी होत होती. अनेकांनी मोबाईलवर छायाचित्रे टिपत सोशल मीडियावर शेअर केली. पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी अशा प्रदर्शनांची गरज असल्याचे शेतकरी बांधवांनी सांगितले.

### आधुनिक शेती तंत्रज्ञानाकडे शेतकऱ्यांचा कल

खाद्यगल्लीत गर्दी असली तरी प्रदर्शनाचा केंद्रबिंदू ठरले ते आधुनिक शेती औजारे आणि अधिक उत्पादन देणारे सुधारित बियाणे व वाण. ट्रॅक्टर जोड उपकरणे, स्प्रे पंप, ठिबक व तुषार सिंचन प्रणाली, पीकसंरक्षण साहित्य याबाबत शेतकऱ्यांनी सविस्तर माहिती घेतली. अनेकांनी प्रत्यक्ष खरेदीही केली.अधिक उत्पादन देणाऱ्या भाजीपाला, धान्य आणि कडधान्यांच्या वाणांना चांगली मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. वाडा कोलम, इंद्रायणी यांसारख्या तांदळाच्या जाती ग्राहकांच्या पसंतीस उतरल्या. काही शेतकऱ्यांनी आगामी हंगाम लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणावर बियाण्यांची नोंदणीही केली.

### दर तासाला भेटवस्तू

प्रदर्शनास भेट देणाऱ्या प्रत्येक नागरिकास प्रवेशावेळी कूपन देण्यात येत आहे. दर तासाला लकी ड्रॉद्वारे एक भेटवस्तू दिली जात असल्याने नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळत असल्याची माहिती संयोजक कारभारी पोटघन (मेजर) यांनी दिली. सर्वच स्टॉल्सवर समाधानकारक विक्री होत असून विक्रेतेही समाधानी असल्याचे त्यांनी नमूद केले. रविवार आणि सोमवारी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर गर्दीत आणखी वाढ होईल, असा अंदाज आयोजकांनी व्यक्त केला आहे.

### गावरान कडधान्ये आणि घरगुती वस्तूंना पसंती

महिलांनी विशेषतः गावरान कडधान्ये, मसाले,पापड-लोणची, घरगुती प्रक्रिया केलेली उत्पादने यांना प्राधान्य दिले. स्वयंसहायता गटांच्या स्टॉल्सवर दिवसभर खरेदीची लगबग सुरू होती. घरगुती वापरातील भांडी, स्वयंपाकघरातील उपकरणे, सेंद्रिय उत्पादने आणि आरोग्यपूरक वस्तूंनाही मागणी असल्याचे दिसून आले. ग्रामीण भागातील महिलांना स्वतः तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी या प्रदर्शनाने व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

### खासदार लंके यांचा संवाद, सेल्फीचा जल्लोष

शनिवारी खासदार नीलेश लंके यांनी प्रदर्शनस्थळी उपस्थित राहून विविध स्टॉल्सना भेट दिली. त्यांनी शेतकरी, महिला बचत गट सदस्य आणि नागरिकांशी संवाद साधत प्रदर्शनाबाबत अभिप्राय जाणून घेतला. अनेकांनी त्यांच्यासोबत सेल्फी काढत आनंद व्यक्त केला. खाऊ गल्लीत फेरफटका मारत त्यांनीही विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. कृषी, उद्योग, ग्राहकपयोगी वस्तू आणि खाद्यसंस्कृतीचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाने पारनेरकरांना नवे दालन खुले केले असून पुढील दोन दिवसांत आणखी विक्रमी गर्दीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नूतनीकरणातून सहकारी बँकेची नवी झेप

## कामकाजात गुणवत्ता व वेग वाढविण्याचा संकल्प सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे प्रतिपादन



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**सहकार चळवळ हा ग्रामीण व सामाजिक विकासाचा कणा असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकरी, महिला बचतगट, लघुउद्योजक आणि सर्वसामान्य कुटुंबांची आर्थिक जीवनरेखा आहे. इमारतीच्या नूतनीकरणामुळे केवळ भौतिक सुविधा सुधारल्या नाहीत, तर बँकेच्या कामकाजात गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेग वाढविण्याचा संकल्प साकार झाला आहे, असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्टेशन रोड शाखा व मुख्य कार्यालय इमारतीच्या नूतनीकरणासह अत्याधुनिक ‘ई-लॉबी’चे उद्घाटन सहकार मंत्री पाटील यांच्या हस्ते, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी आमदार संग्राम जगताप, आमदार मोनिकाताई राजळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी आमदार नरेंद्र घुले, अक्षय कर्डिले, बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले पाटील, उपाध्यक्ष माधवराव कानवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब लक्ष्मण वर्पे, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) मंगेश सूरवसे आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, राज्यातील अग्रगण्य बँकांमध्ये अहिल्यानगर येथील या बँकेची गणना होते. सध्या २८७ शाखांच्या माध्यमातून बँक लाखो ग्राहकांशी जोडली गेली आहे. पीककर्ज, अल्पमुदतीचे कर्ज आणि विविध आर्थिक सुविधा देत बँक ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देत आहे. खासगी बँकांच्या बरोबरीने आधुनिकीकरणाचा मार्ग स्वीकारत जिल्ह्याच्या आर्थिक वैभवात बँकेने मोलाची भर घातली आहे. स्व. शिवाजीराव कर्डिले यांनी पाहिलेले बँकेच्या उत्कर्षाचे स्वप्न आज साकार होत असून, त्यांची उणीव कायम जाणवत राहील, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब आवश्यक असल्याचे नमूद करत त्यांनी

उर्वरीत पान ३ वर

# अभिषेक कळमकर यांच्यावर अत्याचाराचा गुन्हा

## नोकरीचे आमिष, ब्लॅकमेलिंगचे आरोप



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**शहराचे माजी महापौर तथा अभिषेक कळमकर यांच्याविरोधात २५ वर्षीय तरुणीवर अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याने शहरासह राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष असलेल्या कळमकर यांच्याविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविण्यात आली आहे.**

फिर्यादी तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, शाळेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत कळमकर यांनी तिच्याशी संपर्क वाढविला. त्यानंतर नगर शहरातील विविध ठिकाणी तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर येथील एका लॉजवर नेऊन वारंवार अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपीने विश्वास संपादन करून तिला मानसिकदृष्ट्या जखडून ठेवले आणि त्याचा गैरफायदा घेतला.

**व्हिडिओ कॉलद्वारे छळ; व्हायरल करण्याची धमकी**

पीडितेने तक्रारीत नमूद केले आहे की, मोबाईलवर व्हिडिओ कॉल करून वेळोवेळी कपडे काढण्यास भाग पाडले जात होते.

उर्वरीत पान ३ वर

# फळबागेवर चोरट्यांचा डल्ला

## | सव्वा लाखांची संत्री लंपास | काही तासांत आरोपी जेरबंद | ३.२० लाखांचा मुद्देमाल जप्त



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**जिल्ह्यात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शेतकरी आधीच धास्तावलेले असताना चोरट्यांनी आता थेट फळबागांनाच लक्ष्य केले आहे. नगर तालुक्यातील दशमीगव्हाण परिसरातील एका शेतकऱ्याच्या बागेतून तब्बल १ लाख २० हजार रुपये किंमतीची १५०० किलो संत्री आणि प्लॅस्टिक कॅरेट लंपास केल्याची घटना उघडकीस आली. मात्र, पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे काही तासांतच आरोपीला मुद्देमालासह जेरबंद करण्यात आले.**

उर्वरीत पान ३ वर

# कॉपी रोखली म्हणून होमगार्डवर हल्ला

## सोन्याची चेन हिसकावून नेल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा



**पाथर्डी : प्रतिनिधी**

**दहावीच्या परीक्षेदरम्यान गैरप्रकार रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या होमगार्डवरच हल्ला झाल्याची घटना पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथे घडली. कॉपी देण्यासाठी आलेल्या दोघांना रोखल्याचा राग मनात धरून संबंधितांनी होमगार्डला मारहाण केली तसेच त्यांच्या गळ्यातील सुमारे एक तोळ्याची सोन्याची चेन हिसकावून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.** या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसगाव येथील श्री वृद्धेश्वर विद्यालयात २० फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. दहावीच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर

उर्वरीत पान ३ वर

# थायलंडमध्ये अळकुटीच्या प्राध्यापिकेचा झेंडा!

## इंडो-थाय एज्युकेशनल एक्सलन्स अवॉर्डने डॉ. शांताबाई थोरात यांचा सन्मान | प्रवरा परिवारात आनंदाची लहर

**अळकुटी : प्रतिनिधी**

अळकुटी येथील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विभागप्रमुख डॉ. शांताबाई थोरात यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवली आहे. थायलंडमध्ये प्रदान करण्यात आलेल्या इंडो-थाय शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार २०२६ या प्रतिष्ठेच्या सन्मानाने त्यांचा गौरव करण्यात आला.



### बँकॉकमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

थायलंडमधील सुरत थानी राजाभट विद्यापीठ यांच्या वतीने १५ व १६ फेब्रुवारी रोजी बँकॉक येथे ‘‘जागतिक व्यवसाय आणि उदयोन्मुख आव्हाने’’ या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. विविध देशांतील शिक्षणतज्ज्ञ आणि संशोधकांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. या परिषदेदरम्यान वाणिज्य विषयातील अध्यापन व संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. थोरात यांना इंडो-थाय शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### दोन दशकांची शैक्षणिक साधना

डॉ. शांताबाई थोरात या गेली २० वर्षे पदवी व पदव्युत्तर वर्गांना वाणिज्य विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून वाणिज्य विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे.एम.कॉम., एम.ए., बी.एड्., जी.डी.सी. अँड ए., एम.फिल. आणि पीएच.डी. अशा विविध पदव्या त्यांनी प्राप्त केल्या असून संशोधन क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व राज्यस्तरीय परिषदांमध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले असून ते प्रकाशितही झाले आहेत

### ‘मेथड्स इन कॉस्टिंग’ची निर्मिती

एस.वाय.बी.कॉम. अभ्यासक्रमासाठी त्यांनी ‘मेथड्स इन कॉस्टिंग’ या विषयावरील पुस्तक लेखन केले आहे. विद्यार्थ्यांना अवघड संकल्पना सुलभ पद्धतीने समजावून सांगण्याची त्यांची शैली विशेष ठरली आहे.

### मान्यवरांकडून अभिनंदन

डॉ. थोरात यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, तसेच संस्थेचे पदाधिकारी आणि प्राचार्य वर्गाने त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. डॉ. थोरात यांच्या यशामुळे अळकुटीचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकले असून परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या सन्मानामुळे विद्यार्थ्यांमध्येही नव्या उमेदीची प्रेरणा निर्माण झाली आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या




# घरबसल्या करा KYV

## अन्यथा काम करणार नाही FasTag !, स्टेप बाय स्टेप समजून घ्या पद्धत...

**फास्टॅग फसवणूक रोखण्यासाठी सरकारने एक नवीन KYV ( नो युअर व्हेईकल) प्रणाली सुरू केली आहे. या अंतर्गत प्रत्येक ड्रायव्हरला त्यांचा FasTag पडताळणे आवश्यक असेल, अन्यथा FasTag निष्क्रिय केला जाईल आणि टोल पूर्ण भरावा लागेल.**

### फास्टॅगसाठी KYV कसे करावे ?

आतापर्यंत, तुम्हाला KYC या शब्दाची माहिती असेल, परंतु आता FasTag वापरणे सुरू ठेवण्यासाठी तुम्हाला तुमचा KYV देखील करावा लागेल. फास्टॅगशी संबंधित फसवणूक रोखण्यासाठी सरकारने KYV प्रणाली सुरू केली. KYV म्हणजे Know your Vehicle. याद्वारे, ड्रायव्हर्स



त्यांच्या वाहनासाठी जारी केलेला FasTag पडताळू शकतील. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की हे FasTag वापरणाऱ्या प्रत्येकासाठी हे अनिवार्य असेल. याशिवाय, जरी त्यांच्याकडे FasTag असला तरी, ते वापरू शकणार नाहीत आणि त्यांना संपूर्ण टोल शुल्क भरावे लागेल. अधिक वेळ न घालवता, KYV कसे पूर्ण करायचे ते समजून घेऊया...

### ही कागदपत्रे तयार ठेवा...

KYV प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी, तुम्हाला काही कागदपत्रांची आवश्यकता असेल. यामध्ये तुमच्या वाहनाच्या RC ची डिजिटल प्रत, वाहन नोंदणी क्रमांक (VRN), चेसिस क्रमांक आणि तुमच्या मोबाइल फोनशी लिंक केलेले FasTag तपशील समाविष्ट आहेत.

### KYV कसे करावे ?

- प्रथम, तुमच्या बँकिंग अॅप किंवा FasTag पोर्टलवर, जसे की Paytm किंवा ICICI किंवा Amazon वर KYV किंवा Fastag Verification शोधा.
- यानंतर, तुम्हाला तुमच्या बँकिंग अॅप किंवा FasTag पोर्टलवर सांगितलेल्या प्रोसेसला फॉलो करावे लागेल.
- तुम्हाला वेगवेगळ्या कोनातून वाहनाचे स्पष्ट फोटो अपलोड करावे लागतील. तुम्हाला वाहनाच्या विंडशील्डवर स्थापित केलेला FasTag स्पष्टपणे दर्शविणारा फोटोदेखील अपलोड करावा लागेल.
- त्यानंतर तुम्हाला तुमच्या RC ची स्कॅन केलेली प्रत अपलोड करावी लागेल.
- सर्व काही अपलोड झाल्यानंतर Send वर टॅप करा. KYV प्रक्रियेस ७ दिवस लागू शकतात. तुम्हाला तुमच्या लिंक केलेल्या नंबरवर अपडेट मिळेल.
- तुम्ही तुमच्या बँकिंग किंवा फास्टॅग पोर्टल अॅपद्वारे तुमच्या केवायव्हीची स्थिती देखील तपासू शकता.

### लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे

फास्टॅगच्या गैरवापरामुळे सरकारला केवायव्ही सुरू करण्यास भाग पाडले गेले आहे. अहवाल असे दर्शवितात की ट्रकचालक कारसाठी जारी केलेला फास्टॅग वापरत होते. ही प्रक्रिया दर तीन वर्षांनी पुनरावृत्ती करणे आवश्यक आहे. ज्या वाहनासाठी फास्टॅग जारी केला आहे त्यासाठी तो वापरला जात आहे याची पुष्टी करण्यासाठी हे केले जाते.




# YouTube वर किती सबस्क्राइबर्स अन् व्ह्यूजनंतर सुरू होईल कमाई?

## तुम्हाला कोणती पावले उचलावी लागतील ?

**YouTube ने आपले काही फिचर्स अपग्रेड करण्यासह त्यात आणखी भर घालण्याची घोषणा केली आहे. यामुळे व्हिडिओ निर्मात्यांची बरीच सोय होणार आहे. लोक YouTube वर व्हिडिओ बनवून लाखो आणि कोटी रुपये कमवत आहेत. मात्र अजूनही असे बरेच लोक आहेत ज्यांना YouTube वर पैसे कसे कमवायचे, हे कळत नाही. YouTube चॅनेल तयार करण्यापूर्वी, तुम्हाला हे समजून घेतले पाहिजे की YouTube व्ह्यूज, सबस्क्राइबर्स आणि घालवलेल्या वेळेच्या आधारे कसे पैसे देते. जर तुम्ही कठोर परिश्रम केले आणि त्याचे पेमेंट मॉडेल समजून घेतले तर YouTube उत्पन्नाचा एक उत्तम स्रोत असू शकतो. YouTube वर पैसे कमवण्याचे अनेक मार्ग आहेत. तुम्ही वेगवेगळ्या प्रकारे पैसे कमवू शकता, परंतु सर्वात मूलभूत पद्धत म्हणजे YouTube पार्टनर प्रोग्राम.**





### हे निकष पूर्ण करणे गरजेचे...

YouTube पार्टनर प्रोग्राम (YPP) हा YouTube वर पैसे कमवण्याचा सर्वात सामान्य मार्ग आहे. एकदा तुमच्या YouTube चॅनेलचे वर्षाला १,००० सदस्य आणि ४,००० तास पाहण्याचा वेळ झाला की, तुम्ही YouTube पार्टनर प्रोग्रामसाठी अर्ज करण्यास पात्र ठरता. याव्यतिरिक्त तुमचे AdSense खाते असणे आवश्यक आहे.

### जाहिराती होतात सुरू

सर्व निकष पूर्ण केल्यानंतर, तुमच्या व्हिडिओच्या मध्ये मध्ये जाहिराती दिसू लागतात, ज्या जाहिराती शक्यतो लोक सहसा बघताना स्किप करतात. जाहिराती सुरू होताच तुमची कमाई सुरू होते. त्यानंतर YouTube तुम्हाला व्हिडिओ किती वेळा पाहिला गेला आणि किती मिनिटे पाहिला गेला यावर आधारित पैसे देण्यास सुरुवात करते.

### या गोष्टी लक्षात ठेवणे महत्त्वाचे



जर तुम्हाला तुमच्या YouTube चॅनेलवर व्ह्यूज आणि सबस्क्राइबर मिळवायचे असतील तर सातत्य राखा. याचा अर्थ नियमितपणे व्हिडिओ पोस्ट करणे. यामुळे दर्शकांची व्यस्तता वाढेल. याव्यतिरिक्त दर्शकांना व्यस्त ठेवण्यासाठी तुम्हाला उत्कृष्ट संपादनासह स्पष्ट, उच्च-गुणवत्तेचे व्हिडिओ अपलोड करावे लागतील. तुम्ही अपलोड केलेल्या व्हिडिओंचे शीर्षक, वर्णन आणि टॅग काळजीपूर्वक तपासा. व्हायरल होण्याची शक्यता वाढवण्यासाठी ट्रेंडिंग विषयांवर व्हिडिओ तयार करा.

## YouTubers साठी चार चांगल्या घोषणा

YouTube आता अपग्रेडसह पुढे जात आहे. कंपनीचे ध्येय लोकांना YouTube जास्त काळ पाहण्यास प्रोत्साहित करणे आहे. ते YouTubers चे उत्पन्न देखील वाढवेल. YouTubers ला उच्च-गुणवत्तेचे व्हिडिओ तयार करण्यासाठी अनेकदा संघर्ष करावा लागतो. नवीनतम अपडेट अशा व्हिडिओंची गुणवत्ता सुधारण्यासाठी AI चा वापर करेल. याव्यतिरिक्त, थंबनेल आता मोठे असू शकतात, जे ५० MB आकारापर्यंत पोहोचू शकतात. एकूण चार मोठे बदल आहेत.

- थंबनेल फाइल आकार वाढवला : YouTube वरील थंबनेल फाइल आकार २ MB वरून ५० MB पर्यंत वाढला आहे. यामुळे ४K थंबनेलना अनुमती मिळेल. काही क्रिएटर्सना मोठे व्हिडिओ अपलोड करण्याची टेस्टिंग मिळत आहे. यामुळे टीव्हीवर उच्च-गुणवत्तेचे व्हिडिओ चांगले दिसतील. हे बदल प्रेक्षकांना आकर्षित करतील. ही माहिती YouTube चे CEO नील मोहन यांनी YouTube वरील एका पोस्टमध्ये दिली आहे.
- व्हिडिओमध्ये QR कोड दिसतील : क्यूआर कोड आता व्हिडिओमध्ये दिसतील. क्रिएटर त्यांचे प्रोडक्ट व्हिडिओमध्ये जोडू शकतात. दर्शक त्यांच्या फोनने कोड स्कॅन करू शकतात आणि थेट उत्पादन पृष्ठावर जाऊ शकतात. यामुळे खरेदी करणे सोपे होईल. गेल्या वर्षी खरेदीशी संबंधित सामग्री ३५ अब्ज तासांहून अधिक काळ पाहिली गेली. ज्यामुळे क्रिएटरना लक्षणीय उत्पन्न मिळू शकले.
- AI कमी-गुणवत्तेचे व्हिडिओ सुधारेल : YouTube कमी-गुणवत्तेच्या व्हिडिओंना फुल HD मध्ये रूपांतरित करण्यासाठी AI वापरत आहे. भविष्यात 4K साठी सपोर्ट राहील. अर्थात क्रिएटर यावर नियंत्रण ठेवू शकतील आणि मूळ फाइल जतन केली जाईल. दर्शक इच्छित असल्यास जुन्या गुणवत्तेत पाहू शकतात.
- इमर्सिव्ह प्रीव्ह्यूचे फिचर येणार : व्हिडिओ पाहताना इमर्सिव्ह प्रीव्ह्यू उपलब्ध असतील. यामुळे व्हिडिओ बदलणे सोपे होईल. जर तुम्ही निर्मात्याच्या चॅनेल पेजवरून शोध घेतला तर त्या चॅनेलवरील व्हिडिओ दिसतील. पूर्ण YouTube वरील नाही. हे तुम्हाला संबंधित सामग्री अधिक जलद शोधण्यास मदत करेल.





- दर्शक आणि क्रिएटर्सना फायदा : YouTube ला एक प्रमुख टीव्ही प्लॅटफॉर्म बनवण्यासाठी हे बदल केले जात आहेत. खरेदी, गुणवत्ता आणि शोध यातील सुधारणांमुळे प्रेक्षकांना योग्य सामग्री शोधणे सोपे होईल. क्रिएटर्सच्या कमाईतही वाढ होण्याची अपेक्षा आहे. कंपनीला आशा आहे की या बदलांमुळे YouTube घरबसल्या पसंतीचा पर्याय बनेल. हे अपडेट हळूहळू सर्व वापरकर्त्यांपर्यंत पोहोचतील.

# स्टारलिंक भारतात दाखल! मुंबईत कार्यालय घेतल्यानंतर सॅटेलाइट इंटरनेटची घेताहेत चाचणी

**एलोन मस्कची कंपनी स्टारलिंकने भारतात पाऊल ठेवले आहे. देशात सॅटेलाइट इंटरनेट सुरू करण्याच्या दिशेने हा पहिला मोठा प्रयत्न आहे. स्टारलिंकने अंधेरी पूर्व, मुंबई येथे १,२९४ चौरस फूट कार्यालय पाच वर्षांसाठी भाड्याने घेतले आहे. याव्यतिरिक्त कंपनी मुंबईत एक चाचणी घेत असून, ज्याद्वारे स्टारलिंकच्या तंत्रज्ञानाची जनता आणि व्हीआयपींना ओळख करून दिली जाईल.**

भारतात स्टारलिंकच्या सॅटेलाइट इंटरनेट सेवा सुरू करण्याची प्रक्रिया आतापर्यंत कागदपत्रे आणि मंत्रालयापुरती मर्यादित होता. आता, कंपनीने प्रत्यक्षात हालचाली सुरू केल्या आहेत. वृत्तानुसार, मुंबईतील ऑफिस स्पेसचे भाडे कोटींमध्ये आहे. मुंबई स्टारलिंकचे मुख्य केंद्र असेल. याव्यतिरिक्त, कंपनी ९ शहरांमध्ये त्यांचे गेटवे स्टेशन बांधण्याच्या योजनांवर काम करत आहे. हे गेटवे मुंबई व्यतिरिक्त नोएडा, चंदीगड, लखनऊ आणि कोलकाता सारख्या शहरांमध्ये असतील. हे गेटवे स्टारलिंकला देशभरात त्यांच्या सेवा कार्यक्षमतेने चालवण्यास सक्षम करतील.



### स्टारलिंक कधी लाँच होईल ?


भारतात स्टारलिंक सॅटेलाइट इंटरनेटची लाँच तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. तथापि, असे मानले जाते की ते पुढील वर्षी जानेवारी-फेब्रुवारीच्या सुरुवातीला लाँच केले जाऊ शकते. या सेवेच्या लाँचमुळे भारतातील सध्या कनेक्ट नसलेल्या भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी येईल. स्टारलिंकच्या सेवेच्या किमतीबद्दल अनेकांना उत्सुकता आहे. अलिकडच्या ET अहवालात असे म्हटले आहे की भारतातील सर्वात स्वस्त स्टारलिंक योजनेची किंमत १,००० पेक्षा कमी असू शकते. तथापि, किटची किंमत स्वतः ३०,००० ते ४०,००० पर्यंत जास्त असू शकते.

# इन्सुलेटेड की नॉन-इन्सुलेटेड... कोणता गीझर खरेदी करावा ?

**हिवाळ्यात थंड पाण्याने आंघोळ म्हटलं की अंगावर शहारे येतात. त्यामुळे गीझर आवश्यक आहे. आज बाजारात अनेक प्रकारचे गीझर उपलब्ध आहेत. इतके पर्याय पाहता प्रश्न पडतो, की तुम्ही तुमच्या घरासाठी इन्सुलेटेड गीझर खरेदी करावा की नॉन-इन्सुलेटेड ? दोघांमध्ये काय फरक आहे ? या दोन प्रकारच्या गीझरमधील फरक केवळ किंमत किंवा ब्रँडपुरता मर्यादित नाही तर तुमच्या वीज बिल, पाण्याचे तापमान आणि टिकाऊपणावर देखील परिणाम करतो. या दोन प्रकारच्या गीझरमागील तंत्रज्ञान सविस्तरपणे समजून घेऊया...**



- इन्सुलेटेड गीझर म्हणजे काय ? : इन्सुलेटेड गीझर म्हणजे असे गीझर ज्यामध्ये पाण्याची साठवणूक टाकी PUF (पॉलीयुरेथेन फोम) नावाच्या जाड इन्सुलेशन थराने झाकलेली असते. हे पाण्याची उष्णता बाहेर पडण्यापासून रोखते. याचा फायदा असा आहे की एकदा गरम केल्यानंतर, पाणी बराच काळ गरम राहते आणि गीझर वारंवार वापरण्याची आवश्यकता नसते. यामुळे तुमची वीज वाचतेच पण अतिवापर टाळून गीझरचे आयुष्य देखील वाढते. जर तुम्ही थंड भागात राहत असाल जिथे गीझरमध्ये बराच काळ गरम पाणी साठवणे आवश्यक असेल, तर तुम्ही या प्रकारचे गीझर खरेदी करू शकता. या विशेष वैशिष्ट्यामुळे, इन्सुलेटेड गीझरची किंमत नॉन-इन्सुलेटेड गीझरपेक्षा थोडी जास्त असते.
- नॉन-इन्सुलेटेड गीझर म्हणजे काय ? : नावाप्रमाणेच या गीझरमध्ये उष्णता टिकवून ठेवणारा थर नसतो. परिणामी, या गीझरमधील पाणी गरम होताच ते थंड होते. यासाठी गरम पाण्याची गरज असताना प्रत्येक वेळी गीझर चालू करावा लागतो, ज्यामुळे विजेचा वापर वाढतो. या प्रकारचा गीझर अशा लोकांसाठी किंवा ठिकाणांसाठी योग्य आहे ज्यांना काही महिने ते वापरावे लागते आणि मर्यादित संख्येने सदस्य असतात. याचा अर्थ असा की जर गीझर क्वचितच वापरला जात असेल तरच हा पर्याय निवडला पाहिजे. या प्रकारचा गीझर इन्सुलेटेड गीझरपेक्षा स्वस्त आहे.
- केवळ इलेक्ट्रिक गीझर इन्सुलेटेड असतात का? : तुम्हाला प्रश्न पडेल की फक्त इलेक्ट्रिक गीझर इन्सुलेटेड असतात का? हे लक्षात घेण्यासारखे आहे की इलेक्ट्रिक गीझरच्या संदर्भात इन्सुलेटेड गीझरचा वापर केला जातो. याचे कारण असे की दोन मुख्य प्रकारचे गीझर, गॅस गीझर आणि इन्स्टंट गीझर, त्वरित पाणी गरम करतात, म्हणून त्यांना इन्सुलेशनची आवश्यकता नसते. तथापि, जेव्हा सौर गीझरचा विचार केला जातो तेव्हा ते इन्सुलेटेड



असतात. जेणेकरून सूर्याच्या उष्णतेने गरम झालेले पाणी जास्त काळ गरम राहते. आम्हाला आशा आहे की तुम्हाला इन्सुलेटेड आणि नॉन-इन्सुलेटेड गीझरमधील फरक समजला असेल आणि आता तुम्ही तुमच्या गरजेनुसार योग्य निवड करू शकाल.

## शॉर्ट न्यूज

### पांगरीत कामगाराचा दुर्दैवी मृत्यू

■ **अकोले :** पांगरी (ता. अकोले) येथे जिलेटिनच्या स्फोटात उडालेला दगड डोक्यात पडून कोपरगाव तालुक्यातील नितीन धोंडीराव थोरात (वय ३७) या कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाला. पांगरी शिवारातील त्र्यंबक दगडू काळे यांच्या शेतात विहीर खोदण्याचे काम सुरू होते. राहुरी तालुक्यातील आढाव नावाच्या ठेकेदाराने एलआर पोकलन मशिनच्या साहाय्याने आठ दिवसांपासून हे काम सुरू केले होते. विहिरीतील खोदकामासाठी जिलेटिनचा स्फोट घडवला.

### नाट्यगृहाची प्रशांत दामले यांच्याकडून पाहणी

■ **संगमनेर :** ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले यांनी संगमनेर येथील कवी अनंत फंदी खुले नाट्यगृहाची पाहणी केली. आमदार सत्यजित तांबे यांच्या निमंत्रणावरून झालेल्या या भेटीत प्रशांत दामले यांनी रंगमंच, आसनव्यवस्था, प्रकाशयोजना आणि कलाकारांच्या सोयीसुविधांबाबत महत्त्वपूर्ण सूचना केल्या. त्यांनी राज्यातील नाट्यगृहांची सद्यस्थिती चिंताजनक असल्याचे स्पष्ट केले.

### बालविवाह रोखणे काळाची गरज

■ **राहुरी :** न्यायाधीश आदित्य शिंदे यांनी समाजातील बालविवाह रोखण्यासाठी शिक्षण, ये-जा करण्याची सुविधा आणि गावागावात शिक्षण पोहोचणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अहिल्यानगर आणि राहुरी तालुका विधी सेवा समितीने ''बालविवाह मुक्त भारत अभियान'' अंतर्गत आयोजित १०० दिवसीय विशेष मोहिमेनिमित्त राहुरी येथील कै. लालाशेठ बिहाणी विद्या मंदिर प्रशाला येथे आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

### प्रसिद्ध अभिनेता सोनू सुद साईचरणी

■ **संगमनेर :** प्रसिद्ध अभिनेता सोनू सूद यांनी शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यांनी साईबाबांच्या माध्यान्ह आरतीमध्येही सहभाग घेतला. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे यांनी सोनू सूद यांचा सत्कार केला.

### मुळा कालव्याचे २३ फेब्रुवारी पासून आवर्तन

■ **नगर :** पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुळा लाभक्षेत्रातील मुळा उजवा व डाव्या कालव्यावरील शेतकऱ्यांची पाण्याची मागणी लक्षात घेऊन रब्बी हंगाम २ साठी २३ फेब्रुवारी २०२६ पासून आवर्तन सुरू करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. उन्हाच्या तीव्रतेमुळे लाभक्षेत्रात पाण्याची पातळी खालावल्याने शेतकऱ्यांकडून पाणी सोडण्याची मागणी मोठ्या प्रमाणात होत होती.

# माता तुला सलाम!

## १० दिवसाच्या बाळाला घेऊन आई देतेय बारावीची परीक्षा

**नांदेड : प्रतिनिधी**

**जिथे सर्व शब्द गळून पडतात अशी व्यक्ती म्हणजे आई. आई मुलांसाठी सारं काही असते. मुलांचं अस्तित्वच आई असते. अशाच एका आईची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे. या आईचं खूप कौतुक होत आहे. त्यामागे कारणही तसंच आहे. बारावी बोर्डाची परीक्षा विद्यार्थी जीवनातील महत्वाचा टप्पा म्हणून ओळखला जातो. १० फेब्रुवारीपासून परीक्षेला सुरुवात देखील झाली आहे.**




जीवनातातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या बोर्डाच्या परीक्षे दरम्यान विवाहित महिला शिक्षणाचा ध्येय पूर्ण करत आपल्या १० दिवसाच्या तान्हुल्या बाळाला घेऊन परक्षिा देत आहे. तिची शिक्षणाची धडपड पाहून या महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर मातृस्नेह कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. शितल चंद्रकांत चित्ते (२१) असे या मातेचे नाव आहे.

शितल चित्ते या नांदेड शहरातील श्री बसवेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी आहेत. शितल चित्ते यांचा दोन वर्षांपूर्वी विवाह झाला असला तरी त्यांनी शिक्षण पुढे चालू ठेवले. त्यांनी बारावीची परीक्षा देण्याचा निर्णय घेतला, त्यांना घरच्यांनीही साथ देत प्रोत्साहन दिल्यामुळे त्या आपले शिक्षण पूर्ण करत आहेत. त्यांचे पती नोकरीवर जात असल्याने बाळाचा सांभाळ करायला घरी कुणीच नाही.

दुसरीकडे, बारावी बोर्ड परीक्षेचा पेपरही महत्त्वाचा आहे. आईची माया आणि तिला शिक्षणाची असणारी गोडी पाहून परीक्षा केंद्रावर उपस्थित भारावून गेले आहेत. त्यांची ही धडपड पाहून केंद्रावर मातृस्नेह कक्षाची स्थापना करण्यात आली. दरम्यान, परीक्षा केंद्राला माध्यमिक शिक्षणधिकारी माधव सलगर, डायटचे प्राचार्य डॉ अमोल निळेकर, गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांनी भेटी दिल्या. केंद्रप्रमुख प्रा. विजय कदम, सहकेंद्रप्रमुख प्रा. जी. डी. ताडोड, प्रा. विनोद चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर यांच्या मार्गदर्शनातून आणि सहकार्यातून परीक्षा अत्यंत सुरळीत चालू आहेत.

**कक्षात करण्यात आली झुल्याची व्यवस्था**

शितल चित्ते या बाळ २ दिवसाचे असल्यापासून आपल्या बाळाला घेऊन बहिणीसोबत त्या केंद्रावर परिक्षा देत आहे. परीक्षा केंद्रावरील मातृस्नेही या कक्षात बाळासाठी झुल्याची व्यवस्था करण्यात आली. बाळाला झुल्यात झोपवून त्या पेपर देत आहे. या घटनेमुळे परीक्षा केंद्राचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जनजागृतीला प्राधान्य देत शहरात विचारांची शिवजयंती केली साजरी

## स्मायलिंग अस्मिता व छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समितीचा वारसा



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**अहिल्यानगरमध्ये 'स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटना' आणि 'छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समिती' यांनी विचारांची मशाल पेटवली. मागील १७ वर्षांपासून १८ फेब्रुवारी रोजी जनजागृतीपर शिवजयंती साजरी करून या संस्थांनी समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार केवळ घोषणांपुरते मर्यादित न ठेवता ते विद्यार्थी आणि तरुणांच्या मनात रुजवणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. १८ फेब्रुवारीला जनजागृती करून १९ फेब्रुवारीच्या शासकीय शिवजयंती उत्सवात समाजाने मोठ्या संख्येने आणि शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी व्हावे, ही यामागची मूळ संकल्पना आहे.**

यानिमित्त आयोजित कार्यक्रमात महापौर ज्योती गाडे उपस्थित होत्या. 'गेल्या १७ वर्षांपासून सुरू असलेला हा सातत्यपूर्ण उपक्रम कौतुकास्पद आहे. या कार्यासाठी माझ्या कार्यकाळात आवश्यक तो विकास निधी उपलब्ध करून दिला जाईल,' अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. उपमहापौर धनंजय जाधव यांनीही या उपक्रमाला पाठबळ दर्शवले. 'विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे काम आता अंतिम टप्प्यात असून, या विधायक कार्यासाठी निश्चित योगदान दिले जाईल,' असे त्यांनी सांगितले.

नगरसेवक संपत बारस्कर यांनी संस्थेच्या १७ वर्षांच्या प्रवासाचा आणि उल्लेखनीय सामाजिक कार्याचा आढावा घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवराज गुंड यांनी केले, तर उपस्थितांचे आभार करण कराळे यांनी मानले. याप्रसंगी शहरातील अनेक मान्यवर, इतिहासप्रेमी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सर्वांनी मिळून निर्माणाधीन विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या कामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण आणि विचार रुजवण्यावर भर देण्यात येणार आहे. विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या कामाची मान्यवरांकडून प्रत्यक्ष पाहणी यावेळी करण्यात आली.

कार्यासाठी लोकप्रतिनिधींचे सहकार्य आवश्यक हे वैचारिक कार्य पुढे नेण्यासाठी लोकप्रतिनिधींनी साथ द्यावी. तसेच, स्मारकाच्या सुरक्षेसाठी पूर्णवेळ रात्र कर्मचारी नियुक्त करावे, असे आवाहन यशवंत तोडमल यांनी प्रशासनाकडे केले.

वाचकांच्या लेखणीतून


# व्यक्तीची अभिव्यक्ती

**जैसे सूर्यबिंब जरी बचकेचि एवढें।**
**परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडें**
**शब्दांची व्याप्ती तेणे पाडें।**
**अनुभवावी।।**

**संत ज्ञानेश्वर म्हणतात, सूर्यबिंब जरी बचकभर दिलसे तरी त्याला आपला प्रकाश फैलावण्यासाठी (स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ असे) त्रैलोक्यसुध्दा मर्यादित वाटते. आपल्या संस्कृतीत शब्दमहिमा अपार आहे. आपण शब्द व्यापक मानला आहे. त्याच्या व्यापकत्वाचे वर्णन आपल्या ज्ञानेश्वरीत संत ज्ञानेश्वरांनी करून ठेवले आहे. म्हणून संस्कृत भाषेत पाणिनीय व्याकरण, निघंटु (शब्दकोश), यास्काचार्यांचे निरुक्त (व्युत्पत्तीकोश); तर मराठीत भीष्माचार्यरचित व्याकर्ण, दामले यांचे शास्त्रीय मराठी व्याकरण असे ग्रंथ जन्माला आले!**

**व्यक्ती हा शब्द स्त्रीलिंगी आहे. पुल्लिंगी नाही. पण हल्ली लेखनात आणि संभाषणात त्याचा पुल्लिंगी अर्थाने प्रयोग होतो. तो अज्ञात व्यक्ती निघून गेला. पोलिसांनी तो व्यक्ती भर बाजारात बरोबर ओळखला. असे व्याकरणिक प्रयोग चूक आहेत.**

**व्यक्ती हा आपल्या भाषेतील सुंदर शब्द आहे. भारतीय दर्शनशास्त्रात त्याला मानाचे स्थान लाभलेले आहे. जे व्यक्त (प्रकट) होते**



**ती व्यक्ती होय. व्यक्त सृष्टी, व्यक्ताव्यक्त, अभिव्यक्ती हे शब्दही याच वर्गातले सुंदर दार्शनिक शब्द आहेत. अमुक अमुक व्यक्ती फार करारी स्वभावाची आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती. तमुक तमुक नावाची व्यक्ती या गावात नाही. असे शब्दप्रयोग आपण रोजच्या व्यवहारात वापरतो.**

**निर्भेळ स्वातंत्र्य नावाची वस्तू या जगात नाही. बासरीला सात छिद्रे असतात. त्या सात छिद्रांचे बंधन असूनही जातीवंत वादक आपल्या बासरी वादनकलेचा सुंदर आविष्कार करून दाखवितो. व्याकरणशास्त्राच्या बाबतीतही हाच नियम लागू आहे.**

**सबब, व्यक्ती हा शब्द स्त्रीलिंगी असून त्यानुसारच त्याचा व्याकरणिक प्रयोग व्हायला हवा.**

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहिल्यानगर

# एकल मातांना पूर्ण पालकत्वाचा अधिकार

## मुलीच्या दाखल्यातून वडील आणि जात हटवण्याचा उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**




**मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एक ऐतिहासिक निकाल देत स्पष्ट केले आहे की, एकल मातांना पूर्ण पालक म्हणून मान्यता देणे ही कोणतीही दया नसून तो त्यांचा संवैधानिक अधिकार आहे. एका अल्पवयीन मुलीच्या शालेय नोंदीतून वडिलांचे नाव आणि त्यांची जात वगळण्याचे महत्त्वपूर्ण आदेश न्यायालयाने दिले आहेत.**

या प्रकरणातील अल्पवयीन मुलीची संपूर्ण देखभाल तिची आईच करत असतानाही, शालेय दाखल्यावर वडिलांचे नाव आणि त्यांची मराठा ही जात नोंदवण्यात आली होती. याविरुद्ध आईने न्यायालयात याचिका दाखल करून वडिलांचे नाव वगळण्याची आणि मुलीची जात आईच्या महार (अनुसूचित जाती) प्रवर्गाप्रमाणे दुरुस्त करण्याची मागणी केली होती. पितृसत्ताक परंपरेमुळे आईच्या कष्टाची आणि ओळखीची होणारी कुचंबणा थांबवण्यासाठी या महिलेने कायदेशीर लढा दिला होता.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने यावर ऐतिहासिक भाष्य करताना स्पष्ट केले की, मुलाची ओळख केवळ पितृसत्ताक परंपरेवर आधारित असू शकत नाही. भारतीय संविधान समानता आणि वैयक्तिक स्वातंत्र्याला सर्वोच्च स्थान देते. एकल मातांना पूर्ण पालक म्हणून मान्यता देणे ही कोणतीही दया नसून तो त्यांचा संवैधानिक अधिकार आहे, असे नमूद करत न्यायालयाने वडिलांचे नाव आणि जात वगळण्याचे आदेश दिले. वंशपरंपरा किंवा जातीच्या बंधनांपेक्षा मुलाचा सन्मान आणि स्वातंत्र्य महत्त्वाचे असल्याचे सांगत न्यायालयाने समाजातील रूढीवादी मानसिकतेला या निकालाद्वारे मोठा धक्का दिला आहे.

(पान १ वरून)

## नूतनीकरणातून सहकारी बँकेची नवी झेप

कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर सर्व क्षेत्रांत वाढत असल्याचे सांगितले. पारंपरिक शेतीत बदल घडवून आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणे गरजेचे असून तरुणांनी पुढाकार घेऊन जिल्ह्यातील ऊस उत्पादकता वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले.

सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केंद्र शासनाने स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना केली असून केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्या माध्यमातून या क्षेत्राला न्याय देण्याचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सहकारी संस्थांनी केवळ कर्जपुरवठ्यापुरते मर्यादित न राहता शासनाच्या ५१ विविध योजनांचा समावेश करून अधिक सक्षम व सर्वसमावेशक बनावे, असेही ते म्हणाले.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्याची समृद्ध सहकार परंपरा अधोरेखित करत नूतनीकरण झालेली इमारत ही नव्या युगाची सुरुवात असल्याचे सांगितले. ग्राहकाभिमुख सेवा अधिक दृढ करण्याचा हा टप्पा असून जिल्हा मध्यवर्ती बँकेचा चेहरामोहरा बदलत आहे. शेतकरी व सहकारी कारखानदारीच्या प्रगतीसाठी बँक सातत्याने कार्यरत असून पारदर्शकता आणि शिस्तीमुळे ती सर्वसामान्यांची कामधेनू ठरली आहे, असे ते म्हणाले. महिलांच्या बचतगटांना अधिक कर्जपुरवठा करून त्यांना सक्षम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले पाटील यांनी सांगितले की, नूतनीकरणामुळे कामकाज अधिक कार्यक्षम, गतिमान आणि पारदर्शक होणार आहे. सध्या बँकेत ११ हजार २८७ कोटी रुपयांच्या ठेवी असून या भक्कम आर्थिक पायावर बँक स्पर्धात्मक धोरण स्वीकारत पुढे जात आहे. डिजिटल पेमेंटसाठी सुसज्ज व्यवस्था उभारण्यात येत असून स्वतःचा 'क्यूआर कोड' असलेली बँक म्हणून लवकरच स्वतंत्र ओळख निर्माण होईल. अल्पमुदतीच्या कर्जाचे मध्यम मुदतीत रूपांतर करण्याबाबतही सकारात्मक प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमास बँकेचे पदाधिकारी,अधिकारी-कर्मचारी, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी तसेच ग्राहक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभिषेक कळमकर यांच्यावर अत्याचाराचा गुन्हा

तासनतास चालणाऱ्या या प्रकारामुळे मानसिक छळ सहन करावा लागत असल्याचे तिने सांगितले आहे.अत्याचार करतानाचे काही व्हिडिओ चित्रीत करून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत ब्लॅकमेल केल्याचाही गंभीर आरोप फिर्यादीने केला आहे. या संदर्भातील काही व्हिडिओ पुरावेही पोलिसांकडे सादर करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच माजी महापौर कळमकर फरार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यांचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.या घटनेमुळे नगर शहरात संतापाची लाट उसळली आहे. सामाजिक संघटना आणि विविध राजकीय पक्षांकडून या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. पोलिस तपासानंतरच प्रकरणातील सर्व तथ्ये स्पष्ट होणार आहेत.

## फळबागेवर चोरट्यांचा डल्ला

उक्कडगाव येथील शेतकरी पोपट पांडुरंग म्हस्के यांच्या फिर्यादीवरून हा प्रकार समोर आला. दशमीगव्हाण शिवारातील गट क्रमांक १४३ (१) मध्ये त्यांची संत्र्याची बाग आहे. १९ फेब्रुवारी रोजी रात्री ९ ते २० फेब्रुवारी सकाळी ६ या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी बागेवर डल्ला मारला. झाडांवरील १५०० किलो संत्री (सुमारे ८० रुपये प्रतिकिलोप्रमाणे १ लाख २० हजार रुपये) तोडून नेण्यात आली. तसेच संत्री भरण्यासाठी ठेवलेले ४ हजार ९०० रुपये किमतीचे ९८ प्लॅस्टिक कॅरेटही चोरट्यांनी उचलले.

२० फेब्रुवारीला सकाळी संत्री तोडण्यासाठी बागेत गेलेल्या म्हस्के यांना ११० पैकी केवळ १२ रिकामे कॅरेट दिसले. झाडांवर फळे नसल्याचे आणि शेतात टेम्पोच्या टायरचे ठसे आढळल्याने चोरी झाल्याची खात्री झाली. त्यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

तपासाची सूत्रे हाती घेत सहायक पोलिस निरीक्षक गणेश वारुळे यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. गोपनीय माहितीच्या आधारे इरफान बाबा शेख (रा. निंबोडी, ता. नगर, हल्ली रा. मुकुंदनगर) याच्यावर संशय बळावला. त्याचे लोकेशन तपासले असता तो शेंडी परिसरात संत्री विक्रीसाठी जात असल्याची माहिती मिळाली. पोलिस पथकाने सापळा रचत आरोपीला टेम्पोसह पकडले.

त्याच्याकडून चोरलेली संत्री आणि टेम्पो असा एकूण ३ लाख २० हजार ४५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, शैलेश सरोदे, महेश भवार, नितीन शिंदे, सुभाष थोरात, मंगेश खरमाळे, रघुनाथ कुलांगे, विक्रांत भालसिंग आणि विकास शिंदे यांच्या पथकाने केली.

## कॉपी रोखली म्हणून होमगार्डवर हल्ला

बंदोबस्तासाठी नियुक्त असलेले होमगार्ड कृष्णा वांडेकर हे विद्यालयाच्या पाठीमागील बाजूस कर्तव्य बजावत होते. त्यावेळी मोटारसायकलवरून दोन जण परीक्षार्थ्यास कॉपी देण्यासाठी आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. वांडेकर यांनी त्यांना येथून निघून जाण्याचा इशारा देत कॉपी न देण्यास सांगितले.

याचा राग आल्याने संबंधितांनी ''तू आम्हाला ओळखत नाहीस का?'' अशी दमदाटी करत स्वतःची ओळख सांगितली आणि कॉपी देण्यास विरोध करू नये, असा दबाव टाकला. त्यानंतर गणेश सचिन शिंदे व रोहित दिलीप खंदारे (दोघे रा. तिसगाव, ता. पाथर्डी) यांनी वांडेकर यांना मारहाण केली, अशी फिर्याद आहे. झटापटीदरम्यान खंदारे याने वांडेकर यांच्या गळ्यातील सोन्याची चेन ओढून घेतल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील इतर कर्मचारी तेथे धावून आले. त्यामुळे संबंधितांनी तेथून पळ काढला. शासकीय कर्तव्य बजावत असताना कामात अडथळा आणून मारहाण व चोरी केल्याप्रकरणी वांडेकर यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# टाकळी ढोकेश्वरमध्ये महामार्ग कामावर गंभीर आक्षेप

## निकृष्ट दर्जा, सुरक्षा अभाव आणि वाढते अपघात । आंदोलनाचा इशारा

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावरील काँक्रीटीकरणाचे काम सध्या वेगात सुरू असले, तरी या कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. राष्ट्रवादीचे नेते व नीलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष रवींद्र राजदेव यांनी काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करत प्रशासनावर टीकेची झोड उठवली आहे.

कामादरम्यान ट्रॅफिक नियंत्रणासाठी गार्ड किंवा कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसणे, सूचना फलकांचा अभाव आणि अपुरी उपाययोजना यामुळे अपघातांचा धोका वाढल्याचे त्यांनी सांगितले. काळेवाडी येथे नुकत्याच झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. ''या मृत्यूला जबाबदार कोण?'' असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



### रस्त्यावर चिरा; दर्जाबाबत शंका

टाकळी ढोकेश्वर परिसरातील वासुंदे चौक व पारनेर चौक येथे काम सुरू असतानाच काँक्रीट रस्त्यावर चिरा पडल्याचे दिसत आहे. काँक्रिट टाकल्यानंतर आवश्यक तेवढे पाणी मारले जात नसल्याने रस्त्याचा दर्जा खालावत असल्याचा आरोप राजदेव यांनी केला. टाकळी ढोकेश्वर ही पारनेर तालुक्यातील जवळपास ४० गावांची प्रमुख बाजारपेठ आहे. त्यामुळे येथे दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. काम सुरू असल्यामुळे वासुंदे चौक आणि पारनेर चौक येथे मोठी ट्रॅफिक कोंडी होत असून ग्रामस्थ व प्रवाशांची गैरसोय वाढली आहे. कामाला गती देतानाच गुणवत्ता राखणे अत्यावश्यक असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले.

### विकासाच्या नावाखाली जीवितहानी?

गेल्या वर्षभरापासून नगर-कल्याण महामार्गाचे काम सुरू आहे. या कालावधीत वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. अनेक अपघातांत जीवितहानीही झाली आहे. तरी प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ''रस्ते बांधकाम विभागाने अपघात टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. विकासाच्या नावाखाली जीवितहानी होणे हे अत्यंत दुर्दैवी आहे,'' असे मत रवींद्र राजदेव यांनी व्यक्त केले.

### शेतकऱ्यांच्या भरपाईचा प्रश्न प्रलंबित

महामार्गासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या, त्यांना नुकसानभरपाई देण्याचे निर्देश नीलेश लंके यांनी अधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, दोन महिने उलटूनही भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.रवींद्र राजदेव यांनी स्पष्ट इशारा दिला की, ''येत्या दोन दिवसांत कामातील त्रुटी दूर करून दर्जा सुधारला नाही, तर नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल.'' या वेळी उपसरपंच रामभाऊ तराळ, महेश झावरे, संपत तराळ, बाळशीराम पायमोडे, संजय खिलारी, मळीभाऊ रांधवन, अशोक पायमोडे, अंकुश पायमोडे, विक्रम झावरे, कृष्णा बांडे, विकास आल्हाट आदी उपस्थित होते.

### तर तीव्र आंदोलन

''नगर-कल्याण महामार्गावरील वासुंदे चौक व पारनेर चौक येथे निकृष्ट दर्जाचे काम सुरू आहे. कामात गती नाही आणि शेतकऱ्यांच्या भरपाईत दिरंगाई होत आहे. अपघात होऊन जीव जात असताना प्रशासन झोपलेले आहे. तातडीने सुधारणा झाली नाही तर तीव्र आंदोलन करू. विकासाच्या नावाखाली जीवितहानी होऊ देणार नाही,'' असा इशारा महेश झावरे (टाकळी ढोकेश्वर) यांनी दिला. स्थानिकांनी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन काम गुणवत्तापूर्ण आणि सुरक्षित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलन अपरिहार्य असल्याचे संकेत स्पष्टपणे देण्यात आले आहेत.

# शिवज्योतीच्या स्वागताने निघोज दुमदुमले

## 'महाकाल तांडव'ने रंगली अविस्मरणीय शिवजयंती

निघोज : प्रतिनिधी

निघोज येथे शिवबा संघटना व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने साजऱ्या करण्यात आलेल्या शिवजयंती उत्सवाने यंदा अभूतपूर्व उत्साहाची नोंद केली. सकाळी शिवनेरी किल्ल्यावरून आणण्यात आलेल्या पवित्र शिवज्योतीचे गावात मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.



### शिवज्योतीचे जल्लोषात स्वागत

शिवभक्तांनी शिवनेरीवरून आणलेल्या शिवज्योतीचे ग्रामस्थांनी पारंपरिक वेशभूषेत स्वागत केले. या क्षणी उपस्थित प्रत्येकाच्या डोळ्यांत अभिमान आणि भक्तिभाव दाटून आला होता. ग्रामस्थांनी एकजुटीने शिवरायांच्या स्मृतींना वंदन करत उत्सवाची भव्य सुरुवात केली.

### 'महाकाल तांडव'चा थरार

सायंकाळी सहा वाजल्यानंतर 'महाकाल तांडव' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमास प्रारंभ झाला. तब्बल तीन तास चाललेल्या मिरवणुकीत मळगंगा मंदिरासमोर, ग्रामपंचायत चौक आणि निघोज बसस्थानक येथे शिवशंकराच्या महात्म्यावर आधारित नृत्य सादर करण्यात आले. कलाकारांची आकर्षक वेशभूषा, धगधगत्या अग्नी ज्वाला, तसेच महाकाय हत्तीची मूर्ती यामुळे उपस्थितांना आपण प्रत्यक्ष कैलास पर्वतावर आल्याचा भास होत होता. शिव-पार्वती विवाह सोहळ्याच्या सादरीकरणाने कार्यक्रमाची रंगत शिगेला पोहोचली. 'महाकाल पांडव' सादरीकरणाने कार्यक्रमाची सांगता झाली, मात्र तो संपवूच नये, अशी भावना अनेक शिवभक्तांच्या चेहऱ्यावर दिसून येत होती.

### शिवबा संघटनेचे परिश्रम

उत्सवाच्या यशस्वीतेसाठी शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, शिवव्याख्याते प्रा. ॲड. ज्ञानेश्वर कवाद, आदर्श कलाशिक्षक प्रा. ज्ञानेश्वर कवडे, बबनशेठ तनपुरे, राजुभाऊ लाळगे, बाबाजी वाघमारे, भास्करराव कवाद, बाळासाहेब भंडारी, रोहिदास लामखडे, राजू लंके, राहुल शेटे, गणेश लामखडे, शिवाजीराव लंके, निखील वरखडे, शैलेश लामखडे, यश शेटे, मच्छिंद्र लाळगे, लहु गागरे, वसंत वरखडे, निलेश वरखडे, श्रीकांत लामखडे, विशाल लामखडे, आप्पा वराळ, अशोक ढवळे आदी शिवभक्तांनी विशेष परिश्रम घेतले. निघोज ग्रामपंचायत व ग्रामस्थांचेही मोलाचे सहकार्य लाभले. पारनेरचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन भांडवलकर व निघोज पोलिस प्रशासनानेही कार्यक्रमाला उपस्थित राहून सहकार्य केले.

### बाल शिवभक्तांचे विचार

कार्यक्रमानंतर विरोनीका लामखडे, ईश्वरी पवार, शर्वरी काळे, अधिरा लंके आणि शिव लंके या बाल शिवभक्तांनी आपल्या ओजस्वी शब्दांत शिवविचार मांडले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### परंपरेचा उत्साह कायम

गेली अनेक वर्षे शिवबा संघटना व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती सोहळा उत्साहात साजरा केला जात आहे. दरवर्षी आकर्षक देखावे सादर करून उत्सवाला वेगळी उंची दिली जाते. यावर्षीचा 'महाकाल तांडव' कार्यक्रम विशेष लक्षवेधी ठरला असून शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे आणि त्यांच्या शेकडो सहकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. निघोजकरांनी अनुभवलेला हा शिवभक्तीचा जल्लोष यंदाच्या वर्षातील संस्मरणीय ठरला आहे.

# खडकवाडीत शिवजयंतीचा जल्लोष

## विद्यार्थ्यांच्या पारंपरिक वेशभूषेने वेधले लक्ष

खडकवाडी : प्रतिनिधी

खडकवाडी येथील एस. एन. एज्युकेअर इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर प्रभातफेरी काढत गावकऱ्यांना शिवरायांच्या कार्याची माहिती दिली. ''जय भवानी, जय शिवाजी''च्या घोषणांनी परिसर दुमदुमला होता. फेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी शिवचरित्रातील प्रसंगांचे सादरीकरण करत स्वराज्याची प्रेरणा दिली.



### पारंपरिक वेशभूषेचा साज

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नऊवारी साडी, नेहरू पायजमा तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि मावळ्यांच्या वेशभूषेत सहभाग घेतला. या आकर्षक पोशाखामुळे मिरवणुकीला ऐतिहासिक रंग चढला. शिवकालीन लाठीकाठीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले, ज्यामुळे उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

### सांस्कृतिक सादरीकरणांनी रंगली मैफल

इयत्ता पहिली व चौथीच्या विद्यार्थ्यांनी लेझीम सादर करून वातावरणात जोश भरला, तर इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी झांज वादनावर नृत्य सादर केले. छोट्या-छोट्या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने पालक व ग्रामस्थ भारावून गेले.

### मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर पार पडला. यावेळी धनंजय चौधरी, राजेंद्र रोकडे, रवींद्र ढोकळे, निखिल मोढवे, दीपक खाणकर, वैभव चौधरी, भाऊसाहेब रोहोकले, शिवाजी गागरे, खंडू ढोकळे, एम. एन. ढोकळे सर, विशाल गागरे, रामभाऊ ढोकळे, नारायण गागरे, दत्तात्रय रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी प्राचार्य व सर्व शिक्षकांचे कौतुक करत आभार मानले. शिवजयंतीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, शौर्य व संस्कारांची बीजे पेरण्याचा प्रयत्न शाळेकडून करण्यात आला.

# स्वराज्याच्या विचारांचा जागर!

## अळकुटीत ३९६ वी शिवजयंती उत्साहात साजरी



अळकुटी : प्रतिनिधी

छत्रपतींच्या विचारांनी भारलेले वातावरण, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि राष्ट्रप्रेमाची भावना अशा प्रेरणादायी वातावरणात अळकुटी येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. इतिहास विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात स्वराज्य, न्याय आणि समतेच्या मूल्यांचा जागर करण्यात आला.

### शिवजयंती म्हणजे प्रेरणेचा दिवस

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुंदा कवडे होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, शिवजयंती हा केवळ जन्मोत्सव नसून स्वराज्य, न्याय, समानता आणि राष्ट्रप्रेम यांच्या मूल्यांची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे. ''शिवाजी महाराजांनी अन्यायकारक सत्तेविरुद्ध लढा देत हिंदवी स्वराज्य स्थापन केले. त्यांच्या प्रशासनकौशल्यामुळे, किल्ल्यांच्या बांधणीमुळे, आरमार उभारणीमुळे आणि शिस्तबद्ध सैन्य व्यवस्थेमुळे ते आदर्श राजा ठरले. आजच्या नेतृत्वालाही त्यांचे धोरण मार्गदर्शक ठरते,'' असे प्रतिपादन त्यांनी केले.

### समता, न्याय आणि राष्ट्रप्रेमाचा वारसा

इतिहास विभागप्रमुख प्रा. अर्जुन चाटे यांनी शिवरायांच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, छत्रपतींचे कार्य हे स्वराज्य, न्याय, समता आणि राष्ट्रप्रेमाचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्यामुळे मराठा साम्राज्याची भक्कम पायाभरणी झाली आणि पुढील पिढ्यांना स्वातंत्र्याची प्रेरणा मिळाली. शिवाजी महाराजांनी सर्व धर्मांचा आदर राखत स्त्रियांचा सन्मान जपला. शत्रूंच्या स्त्रियांबाबत आदर्श वर्तन आणि प्रजेसाठी न्याय्य कारभार ही त्यांच्या राज्यकारभाराची वैशिष्ट्ये होती. त्यामुळेच महाराष्ट्राच्या भक्कम पायाभरणीत त्यांचे योगदान अमूल्य असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

### विद्यार्थी-प्राध्यापकांची उत्स्फूर्त उपस्थिती

या कार्यक्रमास प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. संजय जाधव, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. सुषमा करकंडे, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. राजाराम गोरडे, सुनिता भालेराव, नितीन घोलप, छाया म्हस्के, विकास सोनवणे, राहुल बोरुडे, सागर शितोळे आदींसह प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. विशाल रोकडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अर्जुन चाटे यांनी केले. अळकुटीत साजऱ्या झालेल्या या शिवजयंती उत्सवातून विद्यार्थ्यांमध्ये स्वराज्याच्या विचारांची नवी ऊर्जा निर्माण झाली.

# ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी संशोधनाची नवी दालने खुली!

## पारनेर महाविद्यालयाचा बी आय आर डी । संस्थेसोबत सामंजस्य करार

पारनेर : प्रतिनिधी

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पारनेर आणि सांगली येथील बायोसाइट इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड डेव्हलपमेंट यांच्यात शैक्षणिक व संशोधन सहकार्य वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा करार पुढील पाच वर्षांसाठी लागू राहणार असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक संशोधनाच्या अद्ययावत संधी उपलब्ध करून देणारा ठरणार आहे.



या करारामुळे पारनेर तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी संशोधन आणि औद्योगिक क्षेत्राची दारे अधिक व्यापकपणे खुली होणार असल्याची भावना शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

### विद्यार्थ्यांना 'हँड्स-ऑन' प्रशिक्षण

सदर कराराअंतर्गत विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना बायोसाइट संस्थेच्या अत्याधुनिक संशोधन प्रयोगशाळेत प्रत्यक्ष प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. प्रकल्प कार्य, औद्योगिक प्रशिक्षण तसेच इंटर्नशिपसाठी विद्यार्थ्यांना थेट मार्गदर्शन मिळणार असल्याने त्यांच्या करिअरला नवी दिशा मिळणार आहे. केवळ सैद्धांतिक ज्ञानापुरते शिक्षण मर्यादित न राहता प्रत्यक्ष प्रयोग आणि संशोधनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यावहारिक दृष्टिकोन विकसित होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### प्राध्यापकांमध्येही ज्ञानदेवाणघेवाण

या करारामुळे दोन्ही संस्थांतील प्राध्यापक व संशोधकांमध्ये नवे तंत्रज्ञान, संशोधन पद्धती आणि शैक्षणिक अनुभवांची देवाणघेवाण होणार आहे. आगामी काळात संयुक्त कार्यशाळा, परिसंवाद आणि परिषदांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.यामुळे महाविद्यालयातील संशोधन संस्कृती अधिक बळकट होऊन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी तयार करता येईल, असेही सांगण्यात आले.

### करारावर मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या

या सामंजस्य करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर आणि बायोसाइट संस्थेचे प्रतिनिधी डॉ. संदीप पाटील यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी उपप्राचार्य तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. तुकाराम थोपटे तसेच अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष समन्वयक प्रा. डॉ. दत्तात्रय घुंगार्डे उपस्थित होते.

### संशोधन गुणवत्तेत पडणार भर

याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर म्हणाले, ''या करारामुळे आपल्या विद्यार्थ्यांना आधुनिक संशोधन क्षेत्रातील नवनवीन संधी उपलब्ध होतील. महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधन गुणवत्तेत यामुळे मोठी भर पडेल. औद्योगिक क्षेत्रातील भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी अधिक सक्षम होतील.'' ग्रामीण पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या संशोधन सुविधांशी जोडणारा हा उपक्रम शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक पाऊल मानला जात आहे.

# 'निघोजला आल्यावर कवाद दादांची उणीव जाणवते'

## मा. सरपंच भिवसेन येवले यांचे प्रतिपादन । निघोजमध्ये रेनवडी दिंडीचे भावस्पर्शी स्वागत

निघोज : प्रतिनिधी

तालुक्यातील आदर्श रेनवडी गावचा पायी दिंडी पालखी सोहळा दरवर्षीप्रमाणे श्री क्षेत्र पिंपळनेरकडे प्रस्थान करत असताना निघोज येथे भावनिक वातावरण पाहायला मिळाले. रेनवडी गावचे माजी सरपंच भिवसेन येवले यांनी यावेळी बोलताना, ''निघोजला आल्यावर जयवंतराव कवाद यांची आठवण कायम येत राहणार. दरवर्षी त्यांच्या घरी थांबून जुन्या आठवणींना उजाळा देत गप्पा रंगायच्या. आज ते आपल्यात नसल्याने त्यांना भेटता येत नाही, ही खंत मनात कायम राहील,'' अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या.



### वारकऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत

यावेळी शिवव्याख्याते ॲड. प्रा. ज्ञानेश्वर कावाद यांनी रेनवडीहून आलेल्या सर्व वारकऱ्यांचे स्वागत केले. ''तुम्ही वारकरी मंडळी आम्हाला सेवा करण्याची संधी देता, हे आमचे भाग्य आहे,'' असे म्हणत त्यांनी दिंडी सोहळ्याचे आभार मानले. हभप राजेंद्र डेरे महाराज यांनी दिंडी सोहळ्याचे नियोजन स्पष्ट करताना जयवंतराव कवाद यांच्या कार्याचा उल्लेख केला आणि त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

### कवाद परिवाराचा सत्कार

या कार्यक्रमास उद्योजक मोहनराव कवाद, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, प्रा. भरत डोके, डॉ. विक्रम वराळ, हभप महादेव कवाद, प्रगतीशील शेतकरी गोरखराव पठारे, पांडुरंग औटी, दिलीप कवाद, रामभाऊ कवाद, मच्छिंद्र ढवळे, सुभाष ढवळे, प्रसाद येवले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रेनवडी दिंडी सोहळ्याच्या वतीने भिवसेन दादाभाऊ येवले यांनी कवाद परिवाराचा सत्कार स्वीकारला. वातावरणात भक्ती, आपुलकी आणि आठवणींची एक वेगळीच ऊब जाणवत होती.

### कृतज्ञतेच्या भावनेने सांगता

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हभप राजेंद्र डेरे महाराज यांनी केले. तर मुंबई ग्रामसुरक्षा दलाचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते बाजीराव भोर यांनी आभार प्रदर्शन करत सर्वांचे मनः पूर्वक आभार मानले. निघोजमध्ये झालेल्या या स्वागत सोहळ्याने दिंडीच्या प्रवासाला भावनिक अधोरेखित केले. जयवंतराव कवाद यांच्या स्मृतींनी भारावलेल्या वातावरणात वारकरी पुढील प्रवासाला निघाले, मात्र त्यांच्या आठवणी ग्रामस्थांच्या मनात दीर्घकाळ रेंगाळत राहणार आहेत.

# एकात्मतेचा जल्लोष!

## पाडळी दर्यात शिवजयंती उत्साहात

पाडळी दर्या : प्रतिनिधी

पाडळी दर्या गावात यंदाची शिवजयंती अभूतपूर्व उत्साहात आणि भक्तिभावाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. सर्वधर्मसमभावाची परंपरा जपत ग्रामस्थांनी एकात्मतेचा आदर्श घालून दिला. गावातील प्रत्येक घर, प्रत्येक रस्ता आणि प्रत्येक चेहऱ्यावर शिवभक्तीचा तेजस्वी झगमगाट पाहायला मिळाला.



### डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान

यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला सन्मानपूर्वक मिरवणुकीत स्थान देत ग्रामस्थ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याकडे रवाना झाले. तेथे पुष्पहार अर्पण करून शिवआरती करण्यात आली.मान्यवरांनी शिवरायांच्या शौर्य, दूरदृष्टी आणि न्यायप्रियतेचा आदर्श युवकांनी आचरणात आणावा, असे आवाहन केले. समाजात शांतता, समता आणि बंधुभाव टिकवण्यासाठी शिवचरित्र प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### समाजप्रबोधनाचा प्रेरणादायी सोहळा

शांतता, शिस्त आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारी पाडळी दर्या येथील शिवजयंती यंदा केवळ उत्सव न राहता समाजप्रबोधनाचा प्रेरणादायी सोहळा ठरली. ग्रामस्थांनी एकजुटीने साजरा केलेला हा उत्सव गावाच्या सामाजिक बांधिलकीचा आणि संस्कारांचा उत्तम नमुना ठरला.

### किल्ले शिवनेरीवरून शिवज्योत

१८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी शिवभक्तांनी ऐतिहासिक किल्ले शिवनेरी येथे जाऊन शिवज्योत आणली. गावात शिवज्योतीचे आगमन होताच जल्लोषात तिचे स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर आणि ''जय भवानी, जय शिवाजी''च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. शिवज्योतीच्या तेजाने गावातील वातावरण भक्तिमय झाले.

### भव्य मिरवणूक; पारंपरिक वेशभूषा

सायंकाळी ५ वाजता शिवस्मारक येथून भव्य मिरवणुकीला सुरुवात झाली. पारंपरिक वेशभूषेत सजलेले युवक-युवती, महिलांचा उत्स्फूर्त सहभाग आणि लहान मुलांचा जोशपूर्ण सहभाग यामुळे मिरवणूक आकर्षणाचे केंद्र ठरली. मिरवणूक बौद्ध विहारात पोहोचल्यावर पूजनाचा कार्यक्रम पार पडला. जनहित उत्कर्ष मित्र मंडळाच्या वतीने थंड पेयांचे आयोजन करण्यात आले. गणेश जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### बालवक्त्यांची ओजस्वी भाषणे

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लहान मुलांची प्रभावी भाषणे. बालकांनी आत्मविश्वासाने शिवचरित्र मांडत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वामुळे वातावरण भारावून गेले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास तिकोणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नवनाथ खोसे यांनी केले. शेवटी सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com